# अदानी इलेक्ट्रिसिटी कर्मचाऱ्यांचे रक्तदान

वार्ताहर/भाईंदर

रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन अदानी इलेक्ट्रिसिटीच्या भाईंदर कार्यालय परिसरामध्ये राज्य रक्त संक्रमण परिषद आणि अदानी फाउंडेशनच्या सहकार्याने दोन दिवस रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांसह रक्तदान केले. यावेळी सर्व रक्तदात्यांना सेफ्टी किट्सचे वितरण करण्यात आले.रक्ताचा तीव्र तुटवडा लक्षात घेता अदानी इलेक्ट्रिसिटीने त्यांच्या कर्मचाऱ्यांना पुढाकार घेत रक्तदान करण्याचे आवाहन केले होते.